MHAU080038252024

## नियमीत दिवाणी दावा क्र. ३११/२०२४ मधील नि.क्र. ०५ खाली आदेश
## (भगवान वि. लक्ष्मीबाई व इतर)

वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तात्पुरता मनाईहुकुम मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीचे कथन की, वादीने प्रस्तुत दावा वाटणी होऊन मिळण्यासाठी आणि कायमस्वरुपी मनाईहुकुम मिळण्यासाठी दाखल केला आहे आणि तो दावा न्यायालयात प्रलंबित आहे.

**०३.** गहेनाजी हनुमंता साखळे हे लिहाखेडी येथील मुळ रहिवासी होते. प्रतिवादी क्र. १ लक्ष्मीबाई यांच्या पत्नी आहेत. गहेनाजी हनुमंता साकळे आणि लक्ष्मीबाई यांना तीन मुले नामे भगवान (वादी), बाबुराव की जे सन २०२३ मध्ये मरण पावले आहेत तसेच प्रतिवादी क्र. २ राजु असे आहेत. तसेच त्यांना तीन मुली नामे शकुंतलाबाई (प्रतिवादी क्र. ७), चंद्रकलाबाई (प्रतिवादी क्र. ८), सुमीत्राबाई (प्रतिवादी क्र. ९), मयत बाबुराव यांना पत्नी ताराबाई (प्रतिवादी क्र. ३), मुले रामेश्वर आणि गजानन (प्रतिवादी क्र. ४ व ५) आणि मुलगी रंजना (प्रतिवादी क्र. ६) आहे.

**०४.** गहेनाजी साखळे हे सन १९८८ मध्ये मरण पावलेले असुन त्यांना मौजे लिहाखेडी येथे दावा जमिन गट क्र. १०७, १०८, २७७, २७८ व ३१२ मध्ये वडीलोपार्जीत जमिनी होत्या व त्यांच्या मृत्यूनंतर वारसा फेरफार क्र. ३२६ जमिन गट क्र. १०७, २७७ व २७८ च्या ७/१२ उताऱ्यात मालकी रकान्यात मयत बाबुराव गहेनाजी साखळे यांच्या नावाची नोंद झालेली असुन त्यांचे भाऊ, आई व बहिणी यांच्या नावाची नोंद ७/१२ उताऱ्याच्या इतर अधिकारात झालेली आहे. त्याचप्रमाणे दावा जमिन गट क्र. ३१२ ही देखील वडीलोपार्जीत जमिन असुन वारसा फेरफार क्र. १९४३ नुसार वादी, त्यांचे भाऊ राजु व त्यांचे मयत भाऊ बाबुराव व आई लक्ष्मीबाई यांच्या नावाची एकत्रीत नोंद ७/१२ उताऱ्याच्या मालकी हक्कात झालेली असुन वादींच्या तीन बहिणींची नोंद ७/१२ उताऱ्याच्या इतर अधिकारात झालेली आहे.

**०५.** दावा जमिन गट क्र. २७८ पूर्वी चार गुंठ्याचा होता व त्यात वादी यांचे वडील गहेनाजी हनुमंता यांची २ आर जमिन व त्यांचे भाऊ संपत हनुमंत यांची २ आर जमिन होती. सदर गटात वडीलोपार्जीत विहीर असुन त्यात वादीच्या वडीलांचा आठ आणे हिस्सा व संपत हनुमंता यांचा आठ आणे हिस्सा होता. जमिन गट क्र. २७८ मध्ये असलेल्या विहरीतील आठ आणे हिस्सा व २ आर जमिन ही वडीलोपार्जीत जमिन असुन सदर गटातील उर्वरीत २ आर जमिन व आठ आणे हिस्सा वादी यांनी यापूर्वीच त्यांचे काका संपत साखरे यांचेकडुन नोंदणीकृत खरेदीखत क्र. ४४८४/२०२५, दि. ०७/११/२०२५ अन्वये खरेदी केलेला असुन अधिकार अभिलेखात त्यांचे नावाची नोंद घेण्यात आलेली आहे. सदर मिळकतीचे अधिकार अभिलेखात विहरीची नोंद सर्वे नंबरच्या काळापासुन असल्याकारणाने विहीर ही वडीलोपार्जीत आहे हे सिध्द होते. सदर विहरीत वादी यांचा स्वतंत्र आठ आणे हिस्सा व वडीलोपार्जीत आठ आणे हिश्यात तिसरा हिस्सा असुन सदर गटात दोन गुंठे जमिन वैयक्तीक मालकीची असुन उर्वरीत दोन गुंठे वडीलोपार्जीत जमिनीत तिसरा हिस्सा आहे.

**०६.** मयत बाबुराव हे गेहनाजी हनुमंत साखरे यांचे मोठे चिरंजीव असल्याने वडीलांच्या मृत्यूनंतर घरातील कर्ता पुरुष आणि घराचा संपूर्ण कारभार त्यांच्या हातात असल्याने सन १९९६ पर्यंत वादी, दुसरे भाऊ राजु, आई लक्ष्मीबाई, मयत भाऊ बाबुराव यांनी एकत्र संसार केला. त्याकाळात वादी आणि त्यांचे भाऊ स्वतः काम करुन स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते.

**०७.** सन १९९७ मध्ये वादी यांचे लग्न झाले. मयत बाबुराव यांची पत्नी, वादी यांची पत्नी आणि वादीची आई यांचेत पटत नसल्याने व मयत बाबुरावची मुले देखील मोठी झाल्याने सन १९९७ मध्ये वादी व त्यांचे दोन्ही भाऊ विभक्त झाले. त्यावेळी झालेल्या तोंडी वाटणीप्रमाणे वादी यास गट क्र. १०७ व १०८ मध्ये एकाच ठिकाणी २४ आर जमिन देण्यात आली. तसेच दावा जमिन गट क्र. २७७ व २७८ मध्ये एकाच ठिकाणी ९२ आर जमिन देण्यात आली. आणि जमिन गट क्र. ३१२ मध्ये १७ गुंठे जमिन देण्यात आली. तसेच गट क्र. २७८ मध्ये असलेल्या वडीलोपार्जीत विहरीच्या पाण्यात देखील सारखा हिस्सा देण्यात आला. तेव्हापासुन वादी विनातक्रार व विनाअडथळा वरील क्षेत्रावर काबीज असुन शेती करुन स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवित आले आहेत. मयत बाबुराव तसेच राजु यांना देखील तेवढीच जमिन देण्यात आलेली आहे. आई लक्ष्मीबाई हिला तिन्ही मुलांनी एक एक वर्षे सांभाळावे असे तोंडी ठरलेले आहे. परंतु वाटण्या झाल्यापासुन वादी हेच त्यांची आई लक्ष्मीबाई हिचा सांभाळ

करीत आलेले आहेत.

**०८.** वादी यांचे ताब्यात असलेल्या जमिनीशी प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांचा कोणताही संबंध नसतांना ते वारंवार भाऊबंधकीच्या वादातुन व त्यांचे वडील आजाराने मरण पावलेले असतांना देखील त्यांनी वादी आणि वादीचे कुटुंबातील सदस्यांवर खोटा आरोप लावुन अपराध क्र. १६४/२०२३, भा.द.वि. कलम ३०२, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. तेव्हापासुन ते वादी व त्यांच्या कुटुंबियांना दावा मिळकतीमध्ये येण्यास मज्जाव करत असल्याने दावा दाखल करण्यास कारण घडले.

**०९.** मयत गहेनाजी हनुमंता साखळे यांचे लिहाखेडी गावात गावठान हद्दीत वडीलोपार्जीत घर आहे. मात्र सदर घर मोडकळीस आल्याने त्यामध्ये कोणीही राहत नाही. वादी यांनी १९९७ मध्ये वाटणी झाल्यानंतर गावालगत असलेल्या जमिनीमध्ये अतिक्रमण करुन घर बांधलेले आहे व त्या घरात ते वास्तव्य करत आहेत. तसेच मयत बाबुराव यांनी देखील सांभाळलेल्या जागेमध्ये घर करुन त्याठिकाणी त्यांचा परिवार राहत आहे. प्रतिवादी राजु देखील लग्न होईपर्यंत वडीलोपार्जीत जागेत राहिला व आजरोजी तो देखील सांभाळलेल्या जागेत घर बांधुन राहत आहे. वादी यास मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लिहाखेडी गावात जाण्यास बंदी असल्याने त्यास वडीलोपार्जीत जागेची कागदपत्रे मिळाली नाहीत म्हणुन त्याने सदर जागेसंदर्भात हिस्सा मागितलेला नाही. मात्र त्यास सदर जागेची कागदपत्रे मिळाल्यानंतर त्या जागी असलेला त्याचा हिस्सा मागण्याचा अधिकार तो राखुन ठेवत आहे.

**१०.** प्रतिवादी क्र. ७ ते ९ वादी यांच्या सख्या बहिणी आहेत. दावा मिळकतीमध्ये हिंदु वारसा कायद्याप्रमाणे त्यांचा देखील हिस्सा आहे. परंतु त्या सर्व लग्नानंतर त्यांच्या पतीकडे राहत आहेत. मात्र त्या एकत्र हिंदु कुटुंबाच्या सदस्य असल्याकारणाने व वादमिळकतीत त्यांचा देखील हिस्सा असल्याने त्यांना प्रतिवादी केलेले आहे.

**११.** वादी लग्न झाल्यापासुन झालेल्या तोंडी वाटणीप्रमाणे त्याचे हिश्यावर आलेल्या वादमिळकतीवर विनातक्रार विनाअडथळा काबीज आहे. मात्र दावाजमिनीत एकत्र कुटुंबकर्ता म्हणुन मयत बाबुरावा यांच्या नावेअसल्यामुळे आणि मयत बाबुराव सुरवातीपासुन दावा मिळकती इतर दोन भावांच्या नावे करत नसल्यामुळे वादी हे

त्यांच्यासोबत गेल्या दोन तीन वर्षांपासुन बोलत नव्हते. त्या काळात मयत बाबुराव हे आजारी असल्यामुळे त्यांचा दवाखान्यात आजारपणामुळे मृत्यू झाला. त्यामुळे वादी यांचे ताब्यातील जमिनी प्रतिवादी क्र. ३ ते ६ यांना मिळतात की काय या कलुषित हेतुने त्यांनी प्रतिवादी क्र. २ यास हाताशी धरुन वादी आणि त्याची पत्नी, दोन मुलांविरुध्द खुनाचा खोटा गुन्हा दाखल केला असुन सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्या प्रकरणाचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्र. २ ते ६ हे वादी यांचे ताब्यातील वादमिळकतीस हरकत अडथळा करित आहेत. म्हणुन शांतताप्रिय वादीपुढे मा. न्यायालयात आल्याखेरीज पर्याय न उरल्यामुळे दावा दाखल केला आहे.

**१२.** दि. १२/०५/२०२४ रोजी वादीची पत्नी आणि मुलगी हर्षदा हे ट्रॅक्टरने नांगरणी करण्यासाठी वाद जमिनीत गेले असता प्रतिवादी क्र. २ ते ६ हे अनाधिकृतपणे आले आणि त्यांना म्हणाले की, तुम्ही यावर्षी जमिन पेरायची नाही, तुम्ही जर येथे आलात तर आम्ही एखाद्याचा मुडदा पाडु अश्या धमक्या दिल्या. त्यामुळे वादीची पत्नी चित्राबाई आणि मुलगी हर्षदा यांनी संबंधीत पोलीस स्टेशनला जाऊन सदर घटना सांगितली असता पोलीसांनी त्यांना उडवाउडवीची उत्तरे देऊन त्यांची तक्रार घेतली नाही व त्यांचेतील प्रकरण दिवाणी स्वरुपाचे असल्याने न्यायालयात जाण्याची समज दिली. करिता देखील दि. १२/०५/२०२४ रोजी सदर दावा दाखल करण्यास कारण घडले.

**१३.** वादी आणि प्रतिवादी क्र. २ ते ६ यांच्यात भाऊबंदकीचा वाद आहे. प्रतिवादी क्र. ३ ते पती बाबुराव हे मरण पावल्याने त्याचा राग धरुन द्वेषापोटी प्रतिवादी क्र. २ ते ६ वादी याचे कुटुंबियास दावा मिळकतीची वहिती करु देत नाही. मयत बाबुराव याचे तिन्ही गटामध्ये एकट्याचे नाव असल्याकारणाने ते सदर जमिनीची खातेफोड देखील करत नाहीत. त्यामुळे वादी यास शेतमिळकतीवर कोणतेही कर्ज घेता येत नाही. त्यामुळे वादीस मुलाचे शिक्षण आणि मुलीचे लग्न करणे असह्य झाले आहे. वादमिळकतींशिवाय वादीस इतर कोणताही उत्पन्नाचा स्त्रोत नाही. जर वादीस वादमिळकतीची पेरणी करता आली नाही तर त्याचे आयुष्यात कधीही भरुन न येणारे नुकसान होईल. प्रतिवादी क्र. २ ते ६ हे वादी व त्यांचे कुटुंबियांवर दाखल केलेल्या खोट्या गुन्ह्याच्या आधारे दावा मिळकती गिळंकृत करण्याचा प्रयत्न करत आहेत. म्हणुन प्रस्तुत दावा प्रलंबित असेपर्यंत वादीच्या हक्कात मनाईहुकुम मिळणे गरजेचे आहे. करिता प्रस्तुत अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**१४.** प्रतिवादी क्र. १ ने नि.क्र. १९ खाली कैफीयत आणि खुलासा दाखल करुन वादीने आणलेला दावा आहे त्या स्वरुपात मान्य केलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी नि.क्र. १२ खाली कैफीयत खुलासा दाखल करुन वादीचा दावा मान्य केलेला आहे. प्रतिवादी क्र. ९ यांचेविरुध्द दि. ०२/०१/२०२५ रोजीचे नि.क्र. १ खालील आदेशाप्रमाणे दावा एकतर्फी चालविण्यात येत आहे. तसेच दि. ०२/०१/२०२५ रोजीचे नि.क्र. ०१ खालील आदेशाप्रमाणे प्रतिवादी क्र. ६ चे विरुध्द दावा विनाकैफीयत चालविण्यात येत आहे.

**१५.** प्रतिवादी क्र. २ ते ५ यांनी नि.क्र. १४ खाली त्यांचा कैफीयत खुलासा दाखल करुन वादीचे दाव्यातील वादी व प्रतिवादी यांचे नातेसंबंध आणि वादमिळकती वडीलोपार्जीत मिळकती असल्याचे कथन मान्य करुन इतर सर्व कथन नाकारलेले आहे.

**१६.** प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचे कथन की, वादीने दाखल केलेला दावा खोटा, बनावट, कपोलकल्पीत आणि सत्य परिस्थीती लपवुन दाखल केलेला आहे. वादीने वादमिळकतीपैकी गट क्र. १६० च्या चतुःसीमा दिलेल्या नाहीत. प्रतिवादी क्र. १ च्या नावे गट क्र. १०८ मधील असलेली १७ आर जमिन सहभागी केलेली नसल्यामुळे व वादीची मुलगी हर्षदा भगवान साखळे हिला दाव्यात सहभागी न केल्यामुळे दावा खारीज होण्यास पात्र आहे. वादीने गट क्र. १०८ च्या खोट्या व बनावट चतुःसीमा दर्शविलेल्या आहेत.

**१७.** प्रतिवादी क्र. १ च्या नावे असलेली गट क्र. १०८, क्षेत्र १७ आर ही जमिन एकत्र हिंदु कुटुंबाची वडीलोपार्जीत मिळकत आहे मात्र प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ ते ६ यांच्या पश्चात वादीची मुलगी हर्षदा हिचे नावे खोट्या व बनावट बक्षीस पत्राआधारे करुन दिलेली आहे. सदर बक्षीस पत्र रद्द करण्यासाठी प्रतिवादी क्र. २ ने प्रतिवादी क्र. १ व इतरांच्या विरोधात नियमीत दिवाणी दावा क्र. १८/२०२४ दाखल केलेला आहे. सदर दावा आजरोजी न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

**१८.** वादमिळकतीबाबत वादी आणि प्रतिवादी यांच्यात कोणत्याही प्रकारे सरसनिरस मानाने कायदेशीर वाटणी झालेली नाही. संपूर्ण वादमिळकती आजदेखील मयत बाबुराव गेहनाजी साखळे यांचे नावे आहेत. करिता वादीस सहहिस्सेदारांच्या विरोधात मनाईहुकुम मागण्याचा काहीएक हक्क व अधिकार नाही. वादमिळकतींपैकी

कोणतेही क्षेत्र वादीच्या ताब्यात नाही. त्यामुळे वादीस मनाईहुकुम मागण्याचा अधिकार प्राप्त होत नाही.

**१९.** गट क्र. १०८ पैकी प्रतिवादी क्र. १ चे नावे असलेली १७ आर जमिन ही मयत बाबुराव गेहनाजी साखळे यांनी स्वकष्टाच्या उत्पन्नातुन दि. ०६/०२/२०२२ रोजी त्यांचे काक संपत हनुमंता साखळे यांचेकडुन प्रतिवादी क्र. १ चे नावे विकत घेतली आहे. त्या मिळकतीवर वादीचा कोणाताही ताबा नाही. गट क्र. १०८ मधील उत्तरेकडील आठ आर जमिन बाबुराव यांच्या ताब्यात होती मात्र त्यांच्या मृत्यूनंतर सदर जमिन प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांच्या ताब्यात आहे आणि दक्षिणेकडील ९ आर जमिन प्रतिवादी क्र. १ च्या ताब्यात आहे.

**२०.** वादमिळकती या वादी प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटुंबाच्या वडीलोपार्जीत मिळकती आहेत मात्र त्यांचे सदर मिळकतीबाबत अद्यापपर्यंत सरसनिरस मानाने वाटणी झालेली नाही. वादमिळकती मयत बाबुराव यांच्या ताब्यात होत्या. त्यापैकी गट क्र. २७७ मधील ९० आर जमिन प्रतिवादी क्र. २ हा लहान असल्याने त्यास उपजिवीकेसाठी व खाण्यासाठी कौटुंबिक व्यवस्था म्हणुन दिलेली आहे. उर्वरीत जमिन मयत बाबुराव यांच्या ताब्यात होती. त्यांचे मृत्यूपश्चात सदर जमिन प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांच्या ताब्यात आहे. गट क्र. ३१२, क्षेत्र ४९ आर यापैकी २० आर जमिन प्रतिवादी क्र. २ च्या ताब्यात आहे व उर्वरीत २९ आर जमिन मयत बाबुराव यांच्या ताब्यात होती. मात्र त्यांच्या मृत्यूपश्चात ती मिळकत प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांच्या ताब्यात आहे.

**२१.** गट क्र. २७८ ही मिळकत वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत मिळकत असुन संपत हनुमंता यांचा सदरील मिळकतीमधील विहरीमध्ये कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार नव्हता. संपत हनुमंता साखळे यांना मुलगा नसल्याने त्यांनी सदर मिळकतीतील २ आर क्षेत्र बेकायदेशीररित्या वादीच्या नावाने केलेले आहे. गट क्र. २७८ मधील विहरीचा भाग हा गट क्र. २७७ च्या पोटाशी असल्याने सदर विहीर गट क्र. २७७ मध्ये काबीज असलेल्या प्रतिवादी क्र. २ च्या ताब्यात आहे.

**२२.** गहेनाजी साखळे हे वादी, प्रतिवादी क्र. २, ८ ते ९ अज्ञान असतांना मरण पावलेले आहेत. वादी, प्रतिवादी क्र. १, २, ८ व ९ यांचा सांभाळ, पालनपोषण व लग्न मयत बाबुराव साखळे यांनी केलेले आहे. हे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ही वादी

यांच्यासोबत राहते. वादी हा भांडखोर स्वभावाचा आहे. वादी आणि मयत बाबुराव साखळे, प्रतिवादी क्र. २ यांच्यात केंव्हाच पटले नाही. वादी त्याचे लग्न झाल्यापासुन विभक्त आहे. वादमिळकतीत वादी आणि प्रतिवादी यांच्यात केव्हाही कोणत्याही प्रकारच्या कथीत तोंडी वाटण्या झालेल्या नाहीत. वादीस वाद मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा हिस्सा देण्यात आलेला नाही.

**२३.** मयत बाबुराव आणि प्रतिवादी क्र. २ यांनी वादीला हिस्सा द्यावा म्हणुन त्याने दि. २८/०६/२०१० रोजी प्रतिवादी क्र. २ मयत बाबुराव आणि इतरांना मारहाण केल्याबाबत फौजदारी खटला क्र. ३८८/२०१० दाखल झाला होता. सदर खटला सिध्द झाल्याने वादीला भा.दं.वि. कलम ३२४ खाली प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सिल्लोड यांनी शिक्षा ठोठावलेली आहे. त्या शिक्षेच्या विरोधात वादीने सत्र न्यायालय, औरंगाबाद येथे क्री.अपील क्र. २०२/२०१९ दाखल केले होते. मात्र सदर अपील देखील दि. ०८/०८/२०२३ रोजी फेटाळण्यात आले आणि प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सिल्लोड यांनी वादीस ठोठावलेली शिक्षा कायम केलेली आहे. वादीने ती शिक्षा न भोगल्यामुळे त्याचेविरोधात पकड वॉरंट निघालेले असुन त्याने पोलीसांना हुलकावणी देत सदरील खोटा व बनावट दावा दाखल केलेला आहे.

**२४.** वादी हा गुंड प्रवृत्तीचा असुन केवळ जमिन वाटुन द्यावी व त्यास विक्री करता यावी या उद्देशाने वादी, त्याची पत्नी आणि मुले यांनी दि. ०५/०७/२०२३ रोजी गट क्र. २७७ मध्ये येऊन बाबुराव गहेनाजी साखळे यांच्याशी वाद घातला व त्यांचा खुन केला. त्यासंदर्भात प्रतिवादी क्र. २ च्या फिर्यादीवरुन वादी आणि इतरांच्या विरोधात भा.द.वि. कलम ३०२, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे. त्याकामी वादीस मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी अटीशर्तीचे अधीन राहुन दि. ०३/०४/२०२४ रोजी जामीन दिलेला आहे. जामीन प्राप्त झाल्यानंतर वादीने प्रस्तुत खोटा व बनावट दावा दाखल केलेला आहे. वादी हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असुन त्याने कुटुंबकर्ता असलेला मोठा भाऊ बाबुराव गणेश साखळे याचा केवळ हिस्सा मिळविण्यासाठी खुन केलेला असल्यामुळे वादीस वादमिळकतीमध्ये हिस्सा मागण्याचा कोणताही अधिकार नाही. वादीने फक्त जमिनीवर ताबा मिळावा यासाठी बाबुराव गणेश साखळे यांचा खुन केलेला आहे. त्याचेविरुध्दची कार्यवाही मा. जिल्हा व सत्र न्यायालय येथे प्रविष्ट आहे.

**२५.** वादीने प्रस्तुत दाव्यात वडीलोपार्जीत घर सामाविष्ट केले नाही. म्हणुन

प्रस्तुत दावा फेटाळण्यास पात्र आहे. सन १९९७ मध्ये कोणत्या तारखेला कोणत्या महिन्यात वादी प्रतिवादी यांच्यात कथीत तोंडी वाटणी झाली याचा उल्लेख दाव्यात करण्यात आलेला नाही. करिता देखील दावा फेटाळण्यास पात्र आहे. प्रतिवादी क्र. ७ ते ९ या वादी व प्रतिवादी क्र. २ च्या सख्या बहिणी असुन त्या त्यांच्या नवऱ्यांकडे राहतात हा मजकुर खरा आहे. मात्र प्रतिवादी क्र. ८ आणि ९ यांचे लग्न मयत बाबुराव गहेनाजी साखळे यांनी केलेले आहे. तसेच मयत बाबुराव यांनी प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांना दि. १६/०३/२०१७ रोजी प्रत्येकी रु. ५०,०००/– एवढी रक्कम बबन खोडके, श्रीरंग महादु डाबके आणि रामराव साळुंके व इतर लोकांसमोर दिलेली आहे. त्याबदल्यात प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांनी वादमिळकतीतील हिस्सा मयत बाबुराव आणि प्रतिवादी क्र. २ यांच्या हक्कात सोडुन दिलेला आहे. मात्र वादी यांची मुलगी हर्षदा हिचे लग्न प्रतिवादी क्र. ९ च्या मुलाशी व्हावे या उद्देशाने प्रतिवादी क्र. ७ ते ९ या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीला केवळ प्रतिवादी क्र. २ ते ६ यांना त्रास देण्याच्या उद्देशाने मदत करत आहेत.

**२६.** वादीने १९९७ मधील कथीत तोंडी वाटणीच्या आधारे कायदेशीररित्या जमिन वाटुन मिळावी यासाठी दावा दाखल केलेला नसल्याने वादीचा दावा विधीबाह्य व मुदत बाह्य असल्याने फेटाळण्यास पात्र आहे. वादीस प्रस्तुत दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. वादी यास मा. उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटलयाची सुनावनी तारीख निश्चीत झाल्याशिवाय मौजे लिहाखेडी गावात प्रवेश करु नये अशी अट लादलेली आहे. वादीने दाव्याचे योग्य ते मुल्यांकन केलेले नसल्याने देखील दावा फेटाळण्यास पात्र आहे.

**२७.** वादी प्रतिवादी यांच्यात वादमिळकतीबाबत कोणत्याही प्रकारची कायदेशीर सरसनिरस मानाने वाटणी झालेली नाही. वादीच्या ताब्यात कोणतेही क्षेत्र नाही. केवळ प्रतिवादींच्या ताब्यातील जमिन ताब्यात मिळण्याच्या उद्देशाने खोटा दावा दाखल करुन मनाईहुकुमाचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे, तो फेटाळण्यास पात्र आहे. जर वादीस प्रस्तुत दाव्यात तात्पुरता मनाईहुकुम मिळाला तर तो त्या आदेशाचा शस्त्राप्रमाणे वापर करेल व त्याला झालेल्या शिक्षेचा व सत्र न्यायालयात दाखल केसचा बदला घेण्यासाठी प्रतिवादी यांना संपूर्ण वादमिळकतीतुन बेदखल करेल. करिता प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**२८.** वादी यांचे कथन तसेच प्रतिवादी क्र. २ ते ६ यांचे कथन विचारात घेता

प्रस्तुत अर्ज निकाली काढण्याकरिता माझे समक्ष खालील मुद्दे उपस्थित होतात. त्या मुद्यांचा निष्कर्ष कारणमिमांसेसह मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादीचे बाजुने प्रथमदर्शनी केस असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | होकारार्थी.. |
| ०२. | दाव्याचा तौलनिक समतोल वादीचा बाजुने आहे काय ? | होकारार्थी.. |
| ०३. | तात्पुरता मनाईहुकुम मंजुर न केल्यास वादीचे अपरिमीत असे नुकसान होईल काय ? | होकारार्थी.. |
| ०४. | आदेश काय ? | नि.क्र. ०५ मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दे क्र. १ ते ३ :–</u>**

**२९.** सर्वप्रथम असे दिसुन येते की, वादी यांनी प्रस्तुत दावा प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचेविरुध्द दाखल केलेला आहे. परंतु वादीने प्रतिवादी क्र. २ ते ६ यांचेविरुध्द कायमस्वरुपी मनाईहुकुम मागितलेला आहे. त्याचप्रमाणे वादीने प्रस्तुत तात्पुरता मनाईहुकुम मिळण्याचा अर्ज देखील केवळ प्रतिवादी क्र. २ ते ६ यांचेविरुध्द दाखल केलेला आहे. वादीचे कथन असे आहे की, वादमिळकत ही त्याचे मयत वडील गहेनाही हनुमंता साखळे यांचे वडीलोपार्जीत हिंदु एकत्र कुटुंबाच्या मिळकती आहेत. त्यांच्या वडीलांचे निधन सन १९८८ मध्ये झालेले असुन त्यांचे वडीलांचे पश्चात ते स्वतः, त्यांची आई प्रतिवादी क्र. १, त्यांचा भाऊ नामे राजु प्रतिवादी क्र. २, प्रतिवादी क्र. ३ चे पती आणि प्रतिवादी क्र. ४ ते ६ चे वडील मयत बाबुराव आणि त्यांच्या तीन बहिणी प्रतिवादी क्र. ७ ते ९ हे वादमिळकतीचे सहभागधार होते.

**३०.** वादीचे पुढे असे कथन आहे की, १९९७ मध्ये त्यांचा विवाह झाल्यानंतर त्यांचा मयत भाऊ बाबुराव याची पत्नी आणि त्यांची पत्नी तसेच आई यांचेत न पटल्यामुळे ते वेगळे निघाले आणि कुटुंबासह स्वतंत्र राहु लागले. त्यावेळी वादमिळकतीसंदर्भात तोंडी वाटणी करण्यात आली आणि त्या तोंडी वाटणीप्रमाणे त्यांना गट क्र. १०७ व १०८ मध्ये एकाच ठिकाणी २४ आर क्षेत्र देण्यात आले. तसेच गट क्र. २७७ व २७८ मध्ये ९२ आर आणि गट क्र. ३१२ मध्ये १७ गुंठे जमिन देण्यात आली.

तेव्हापासुन सदर जमिन त्यांचे ताबेउपभोगात आहे. मात्र वादमिळकतीच्या मालकीहक्क सदरी एकत्र कुटुंब कर्ता म्हणुन मयत बाबुराव यांचे नाव लागले असुन वादी, दुसरा भाऊ राजु, त्यांची आई आणि तीन बहिणी यांचे इतर हक्क सदरी नाव लागलेले आहे.

**३१.** प्रस्तुत दाव्यात महत्वाची बाब अशी की, प्रतिवादी क्र. ७ ने नि.क्र. १२ वर कैफीयत खुलासा दाखल करुन वादीचा दावा आहे त्या स्वरुपात मान्य केला आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ जी की, वादी, प्रतिवादी क्र. २ आणि प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांची आई आणि प्रतिवादी क्र. ३ ची सासु व प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांची आज्ञी आहे, तिने वादीचा दावा आहे त्या स्वरुपात मान्य केला आहे. केवळ प्रतिवादी क्र. २ ते ५ यांनी नि.क्र. १४ वर त्यांचा कैफीयत खुलासा दाखल करुन वादीचे दाव्यास आणि प्रस्तुत तात्पुरत्या मनाईहुकुमाच्या अर्जास विरोध केलेला आहे.

**३२.** मात्र प्रतिवादी क्र. २ ते ५ यांनी देखील वादीने प्रतिवादींसोबत दर्शविलेले नातेसंबंध मान्य केलेले आहेत. एवढेच नव्हे तर वादमिळकती वादी प्रतिवादींच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या वडीलोपार्जीत मिळकती आहेत असे देखील कथन केलेले आहे. परंतु प्रतिवादी क्र. २ ते ५ चे म्हणणे असे आहे की, वादमिळकतीमध्ये वादी कथन करत असल्याप्रमाणे १९९७ मध्ये कोणत्याही प्रकारची कुटूंबवाटणी झालेली नाही आणि कोणत्याही वादमिळकतीपैकी कोणतेही क्षेत्र वादी याचे ताबेउपभोगात देण्यात आलेले नाही. आजरोजी वादी यांचे ताबेउपभोगात कोणतीही वादमिळकत नाही. त्यामुळे वादी यास दावा दाखल करण्याचा तसेच तात्पुरता मनाईहुकुम मागण्याचा कोणताही अधिकार नाही.

**३३.** मात्र प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचे असे कथन आहे की, वादग्रस्त मिळकती या मयत बाबुराव यांच्या ताब्यात होत्या. त्यापैकी गट क्र. २७७ पैकी ९० आर जमिन ही प्रतिवादी क्र. २ यास तो लहान असल्याने त्याला उपजिवीकेसाठी व कौटूंबिक व्यवस्थेपोटी देण्यात आलेली आहे आणि उर्वरीत जमिन मयत बाबुराव यांच्या ताब्यात होती व ती आता प्रतिवादी क्र. २ ते ५ यांच्या ताब्यात आहे. तसेच गट क्र. ३१२ पैकी ४९ आर जमिनीपैकी २० आर जमिन प्रतिवादी क्र. २ च्या ताब्यात आहे आणि उर्वरीत २९ आर जमिन मयत बाबुराव यांच्या ताब्यात होती व ती मिळकत आता त्यांच्या निधनानंतर प्रतिवादी क्र. २ ते ५ यांच्या ताब्यात आहे. याठिकाणी ही बाब ठळकपणे दिसुन येते की, एकीकडे प्रतिवादी क्र. २ ते ५ वादमिळकतीमध्ये वादी कथन करत असल्याप्रमाणे १९९७ मध्ये कोणतीही वाटणी झालेली नाही असे म्हणतात आणि

त्याचवेळी वादमिळकतीपैकी काही मिळकत प्रतिवादी क्र. २ आणि मयत बाबुराव यांचे ताब्यात दिल्याचे कथन करतात. यावरुन असे दिसुन येते की, वादमिळकतीमध्ये १९९७ मध्ये कौटूंबिक वाटणी झाल्याचे वादीचे कथन प्रथमदर्शनी असुन प्रतिवादी कथन करत असलेली बाब की, वादमिळकतीमध्ये कोणतीही वाटणी झालेली नाही हे कथन विश्वासार्ह वाटत नाही.

**३४.** प्रस्तुत प्रकरणात अत्यंत महत्वाची बाब अशी की, प्रतिवादी क्र. १ या मयत गहेनाही हनुमंता साखळे यांच्या पत्नी आहेत. त्यामुळे मयत गहेनाजी साखळे यांच्या मुलांमध्ये हिंदु एकत्र कुटूंबाच्या वडीलोपार्जीत शेतमिळकतींमध्ये कुटूंबवाटणी झाली किंवा कसे हे ठरविण्यासाठी प्रतिवादी क्र. १ च्या विधानाला अनन्यसाधारण महत्व आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. १ यांनी वादी यांनी आणलेला दावा आहे त्या स्वरुपात मान्य केलेला आहे. त्यामुळे वादी याने १९९७ मध्ये वादमिळकतीची तोंडी वाटणी झालेबाबत जे विधान केलेले आहे ते विधान प्रथमदर्शनी विश्वासार्ह वाटते. तसेच प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांनी देखील वादी याने वाटणीबाबतचे केलेले कथन वादीचा दावा स्विकारुन मान्य केलेले आहे.

**३५.** प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचे केवळ असे कथन आहे की, वादी हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असुन त्याने केवळ वादमिळकतीमध्ये हिस्सा मिळावा याकरिता एकत्र कुटूंब कर्ता असलेला मोठा भाऊ बाबुराव गहेनाजी साखळे याचा खुन केलेला असल्याने तो वडीलोपार्जीत मिळकतीमध्ये हिस्सा मागण्यास पात्र नाही किंबहुना त्यास कायद्याने हिस्सा मिळु शकत नाही. प्रतिवादी यांनी ज्या खुनाच्या गुन्ह्याचा उच्चार केला आहे त्या अपराधाचे प्रतिवादी क्र. २ राजाराम उर्फ राजु गहेनाजी साखळे याने दि. ०८/०७/२०२३ रोजी दाखल केलेली फिर्याद आणि त्या फिर्यादनुसार अजिंठा पोलीस स्टेशनला दाखल अपराध क्र. १६४/२०२३, दि. ०८/०७/२०२३, भा.दं.वि. कलम ३०२, ५०४, ३४ ची प्रथम खबरी अहवालाची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर दस्तांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी भगवान गहेनाजी साखळे, त्याचा मुलगा विशाल उर्फ गोपीनाथ भगवान साखळे, दुसरा मुलगा आकाश भगवान साखळे आणि पत्नी सुभद्राबाई उर्फ चित्राबाई भगवान साखळे यांना आरोपी म्हणुन सहभागी केले आहे.

**३६.** नमुद अपराध क्र. १६४/२०२३ ची फिर्याद आणि प्रथम खबरी अहवालाचे सुक्ष्म अवलोकन केले असता असे केव्हाही दिसुन येत नाही की, वादीने

वादमिळकतीमध्ये हिस्सा मिळण्यासाठी बाबुराव गहेनाजी साखळे यांचा खुन केला. याऊलट असे दिसुन येते की, दि. ०५/०७/२०२३ रोजी प्रतिवादी क्र. २ त्यांचे शेतामध्ये गुराढोरांना चारा पाणी करुन थांबलेला होता. त्याचवेळी त्याचा मोठा भाऊ बाबुराव, वहिनी ताराबाई, दगडु नामदेव साखळे, कुशीवर्ताबाई गणेश फरकाडे, प्रतिवादी क्र. २ ची मुलगी दिपाली हे शेतात मिरची तोडण्यासाठी आले होते आणि मिरची तोडल्यानंतर बाबुराव यांच्या शेतात आंब्याच्या झाडाखाली बसलेले होते. प्रतिवादी क्र. २ त्यांचे शेतात पाईपची जोडजाड करत होते. दुपारी २.३० ते ३.०० चे सुमारास वादी भगवान, त्याची मुले विशाल व आकाश आणि पत्नी सुभद्राबाई उर्फ चित्राबाई हे शेतामध्ये आले. त्यावेळी वादी आणि प्रतिवादी क्र. २ चा मावसभाऊ दगडु साखळे वादीस म्हणाला की, बाबुरावच्या शेतातील मका चांगली दिसते. त्यावेळी वादी त्यास म्हणाला की, त्या मक्यामध्ये ढोरं घालु का ? त्यावर बाबुराव म्हणाला की, तुला माझी मका चांगली दिसत नसेल तर ढोरं घाल. तेव्हा वादीने त्याचे ढोरं रस्त्यावर सोडले व बाबुरावच्या अंगावर धावत जाऊन म्हणाला की, तुझ्याच बापाचे शेत आहे का, आमच्या बापाचे शेत नाही का ? असे म्हणुन वादीने बाबुरावचे अवघड जागेला धरुन पिरगळले व टांगेत हात घालुन उचलुन टाकले. त्याचवेळी वादीचे मुले आणि पत्नी यांनी देखील बाबुरावचे पोटावर व अंगावर मारहाण केली. तेथे उपस्थित असलेल्या लोकांनी भांडण सोडविले. तेव्हा प्रतिवादी क्र. २ आणि मारोती विठोबा फरकांडे यास बोलावुन मोटारसायकलने बाबुराव यास सरकारी दवाखान्यात नेले मात्र डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. एकंदरीत वादी याने वादमिळकतीमध्ये हिस्सा मागण्यासाठी मयत बाबुराव याचा खुन केला असे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही.

**३७.** प्रतिवादींचे असेही कथन आहे की, वादीने त्यास हिस्सा मिळावा म्हणुन दि. २८/०६/२०१० रोजी प्रतिवादी क्र. २, मयत बाबुराव आणि इतरांना मारहाण केली होती. त्याबाबत त्याचेविरुध्द फौजदारी खटला क्र. ३८८/२०१० दाखल झाला होता व त्या प्रकरणात सिल्लोड येथील न्यायदंडाधिकारी यांनी त्याला भा.द.वि. कलम ३२४ अन्वये शिक्षा ठोठावली होती. त्या शिक्षेविरुध्द त्याने सत्र न्यायालय, औरंगाबाद येथे फौजदारी अपील क्र. २०२/२०१९ दाखल केले होते मात्र ते अपील सुध्दा दि. ०८/०८/२०२३ रोजी फेटाळण्यात आले असुन न्यायदंडाधिकारी न्यायालयाचा निकाल कायम ठेवलेला आहे. त्यामुळे त्याचेविरुध्द न्यायदंडाधिकारी न्यायालय, सिल्लोड यांनी अटक वॉरंट काढलेले असुन त्याचेविरुध्द अटक वॉरंट असतांना त्याने खोटा दावा दाखल केलेला आहे.

**३८.** वादी यांना एखाद्या प्रकरणात न्यायालयाने दोषी सिध्द धरले असल्यामुळे तो वडीलोपार्जीत मिळकतीमध्ये हिस्सा मागण्यास किंवा वडीलोपार्जीत जमिनीची वहिवाट करण्यास अपात्र ठरतो असा कोणताही कायदा नाही. तसेच वादी याचे विरुध्द आणि त्याचे मुले आणि पत्नी यांचेविरुध्द मोठा भाऊ मयत बाबुराव याच्या खुनाचा आरोप ठेवण्यात आलेला आहे. जोपर्यंत मा. सत्र न्यायलयात प्रकरणाची सुनावणी पूर्ण होत नाही आणि सुनावणीअंती त्यास न्यायालय दोषी धरत नाही तोपर्यंत वादी हा भा.दं.वि. कलम ३०२ या कलमाखाली केवळ आरोपी असुन गुन्हेगार होत नाही. वडीलोपार्जीत मिळकतीसंदर्भात स्थापित कायदा असा आहे की, जर एखाद्या मुलाने वडीलोपार्जीत मिळकतीमध्ये हिस्सा मिळण्याकरिता त्याचे वडील किंवा आई यांचा खुन केला असेल आणि त्याबाबत सक्षम न्यायालयाने त्यास दोषीसिध्द मानले असेल तर सदरचा दोषसिध्द गुन्हेगार वडीलोपार्जीत मिळकतींमध्ये हिस्सा मिळण्यास पात्र राहत नाही. प्रस्तुत प्रकरणात वादमिळकती वादी यांचे मयत वडील यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या वादमिळकती आहेत. ज्यामध्ये वादी मुलगा म्हणुन, प्रतिवादी क्र. १ ही मयत गहेनाजी हनुमंता साखळे यांची पत्नी म्हणुन आणि प्रतिवादी क्र. २ मयत गहेनाजी हनुमंता साखळे यांचा मुलगा तसेच प्रतिवादी क्र. ७ ते ९ या मुली म्हणुन सहभागधारक आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ३ ते ६ हे देखील मयत बाबुराव गहेनाजी साखळे यांचे वारस म्हणुन सहभागधारक आहेत. त्यामुळे वादी त्याचेवर मोठा भाऊ मयत बाबुराव याचे खुनाचा आरोप असल्याने तो त्याच्या वडीलांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या वादमिळकतींचा उपभोग घेण्यास अपात्र ठरु शकत नाही.

**३९.** प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी दिलेल्या कैफीयत खुलाश्यावरुन हे प्रथमदर्शनी सिध्द होते की, मयत गहेनाजी हनुमंता साखळे यांच्या मृत्यूनंतर व वादी यांचे १९९७ मध्ये झालेल्या विवाहानंतर प्रतिवादी क्र. १ आणि ७ ते ९ यांचे उपस्थितीत कौटुंबिक वाटणी झालेली असुन त्या वाटणीप्रमाणे काही मिळकत वादी यांना उपजिवीकेसाठी देण्यात आलेली आहे. यास प्रतिवादी क्र. २ ते ६ यांचे कथन पुढीलप्रमाणे पुष्टी देते की, त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. ८ व ९ यांचे लग्न रु. २ लाख खर्च करुन मयत बाबुराव गहेनाजी साखळे यांनी केले आहे. तसेच प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांना दि. १६/०३/२०१७ रोजी गावातील इसम नामे बबन खोडके, श्रीरंग महादु डाबके, रामराव साळुंके आणि इतरांच्या मदतीने वादमिळकतीमध्ये त्यांच्या असलेल्या वडीलोपार्जीत हिस्याबद्दल प्रत्येकी रु. ५०,०००/– दिलेले आहेत आणि त्यांनी त्यांचा हिस्सा सन २०१७ मध्ये मयत बाबुराव आणि प्रतिवादी क्र. २ यांच्या हक्कात सोडुन दिलेला आहे. याचाच अर्थ असा की, वादी आणि प्रतिवादी यांचेत

वादमिळकतीची तोंडी वाटणी झालेली आहे.

**४०.** प्रतिवादी यांचे कथनावरुन हे दिसुन येते की, वादी आणि प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचेमध्ये वैमनस्य आहे. तसेच प्रतिवादी क्र. ३ चे पती मयत बाबुराव यांच्या खुनाचा वादींवर आरोप आहे. त्यामुळे नैसर्गिकरित्या प्रतिवादी क्र. २ ते ६ यांचेत वैमनस्य आहे. त्यामुळेच प्रतिवादी क्र. २ ते ६ हे असे म्हणत आहे की, वादी यास वादमिळकतींमध्ये कोणतीही वाटणी दिलेली नसुन कोणतीही मिळकत त्याचे ताब्यात नाही. परंतु यापूर्वी केलेल्या चर्चेप्रमाणे प्रतिवादी क्र. २ ते ६ यांच्याच कथनावरुन मयत गहेनाजी हनुमंत साखळे यांच्या वडीलोपार्जीत शेतमिळकतींमध्ये त्यांच्या मुलांमध्ये तोंडी वाटणी झाल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. त्यामुळे वादी यास त्याचे ताबेउपभोगात असलेली वादमिळकत शांततामय मार्गाने उपभोग घेऊ देणे हे गरजेचे आहे. करिता वादीचे हक्कात प्रतिवादी क्र. २ ते ६ यांचेविरुध्द तात्पुरता मनाईहुकुम मंजुर करणे इष्ट वाटते. कारण वादीचे हक्कात तात्पुरता मनाईहुकुम मंजुर न केल्यास वादी त्याचे ताबेउपभोगातील वादमिळकत कसु शकणार नाही. त्यामुळे त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. याऊलट प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. वरील सर्व चर्चेवरुन हे सिध्द होते की, वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे. दाव्याचा तौलनिक समतोल देखील वादीच्या बाजुने आहे आणि मनाईहुकुम मंजुर न केल्यास वादीचेच अपरिमीत असे नुकसान होईल. करिता वरील सर्व चर्चेअंती मी मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवितो आणि मुद्दा क्र. ४ करिता पुढीलप्रमाणे अंतीम आदेश पारीत करतो :–

## आदेश

i. वादीच्या हक्कात दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत तात्पुरता मनाईहुकुम मंजुर करण्यात येत आहे.
ii. प्रतिवादी क्र. २ ते ६ यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी वादीचे ताबेउपभोगात असलेल्या वादमिळकतीचे शांततामय कब्जेउपभोगास कोणत्याही प्रकारे स्वतः किंवा इतर कोणत्याही त्रयस्थ इसमामार्फत हरकत अडथळा करु नये.

KAILAS TRYAMBAK ADHAYKE
Digitally signed by KAILAS TRYAMBAK ADHAYKE
Date: 2025.06.24 11:36:03 +0530

दि. २३/०६/२०२५

(के. टी. अढायके)
सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),
सिल्लोड.